MHKO180003922026

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.२२३/२०२६**
**महाराष्ट्र सरकार वि. नासिर कलंदर बागवान आणि इतर**
**:: न्यायनिर्णय ::**
**निशाणी क्र.०७ लगत.**
(अधिघोषित दिनांक २३.०७.२०२६)

अभियोगपक्षातर्फे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील श्री. सं.सि.नदाफ व आरोपींतर्फे विद्यमान वकील श्रीमती श.प्र.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे कारण मिमांसासहित खालीलप्रमाणे –

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | घटनेवेळी आरोपी क्र.१ हा स्वत:च्या व आरोपी क्र.२ याच्या फायदयाकरीता लोकांकडून पैसे घेवून कल्याण नावाचा जुगार चालवित होता, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| २. | आदेश काय ? | ... आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०३. आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच मोहन शांतिनाथ माणगावे यांची एकमेव साक्ष निशाणी क्र.०७ लगत नोंदविली आहे. त्यानंतर, तक्रारदार पोलीस शिपाई पोपट साधु ऐवळे, घटनास्थळ पंचनामा तयार करणारे पोलीस नाईक पवार, तपासीक अंमलदार महिला पोलीस हवालदार अस्मीता आण्णासो पाटील व उर्वरीत साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्याकरीता अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने उक्त साक्षीदारांना न्यायालयासमक्ष हजर केले नाही. त्यामुळे, अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपींना गुन्ह्यात गोवण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणला नसल्यामुळे आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र.१ करीता** :-

०४. पंच मोहन यांनी दिनांक २६.०३.२०२६ रोजी पोलीसांनी एका कागदावर त्यांची सही घेतल्याचे कथन केले आहे. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सही त्यांची असली तरी त्यातील मजकूराविषयी त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. पंच मोहन हे अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, पंच मोहन यांच्या साक्षीपुराव्यातुन अभियोगपक्षास प्रस्तुत प्रकरणातील घटना आणि घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०५. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने तक्रारदार, पंच राकेश सुग्रीव आवळे, घटनास्थळ पंचनामा तयार करणारे पोलीस नाईक पवार, तपासिक अंमलदार पाटील व उर्वरित साक्षीदार यांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास लेखी तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल सिध्द करता आले नाहीत. तसेच, पंच मोहन यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे आणि पोलीस नाईक पवार व पंच राकेश यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०६. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, पंच मोहन यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे आणि तक्रारदार, पोलीस नाईक पवार, तपासिक अंमलदार पाटील, पंच राकेश व उर्वरीत साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास आरोपींविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे, अभियोगपक्षास आरोपींविरुध्द लावण्यात आलेल्या गुन्ह्याची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. सबब, अभियोगपक्षास आरोपींविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करता आला नाही. म्हणुन मुद्दा क्र.१ करीता मी नकारार्थी उत्तर देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीता** :-

०७. अभियोगपक्षाच्या एकुण साक्षीपुराव्यावरुन आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपींना संशयाचा फायदा देवून त्यांची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल ओपो कंपनीचा एक मोबाईल हॅण्डसेट पोलीसांकडून परत मिळाला असलेबाबत आरोपी क्र.१ याने निशाणी क्र.०८ वर पुरसीस दाखल केली आहे. म्हणुन, मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: आ दे श ::**

१. आरोपी क्र.१ नासिर कलंदर बागवान व आरोपी क्र.२ बाबासो उर्फ जवाहर जिनगोंडा पाटील यांची महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्देमालातील एक चिठ्ठी व एक बॉलपेन हे मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने सदर मुद्देमाल अपीलीय कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. जप्त मुद्देमालातील रोख रक्कम रु.१,०००/- ही रक्कम अपीलीय कालावधीनंतर सरकारजमा करण्यात यावी.

५. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी सहा महिने कालावधीकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- किंमतीचे वैयक्तीक बंधपत्र व प्रत्येकी तितक्याच रक्कमेचे एका जामिनदाराचे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.07.23 17:20:46 +0530

दिनांक : २३.०७.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.